# नियमित दिवाणी दावा क्र. १४८/२०२१ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश
## हरी जैन वि. श्रीरंग कोकरे व इतर

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे अर्जातील हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :–**

२. वादीचे कथन असे आहे की, मौजे उचेठाण, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथील गट क्र. १३०/१/अ/२/अ/४ ही मिळकत दाव्याचा विषय आहे. सदरची मिळकत वादीच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची मिळकत आहे. दावा मिळकतीच्या पश्चिमेस मंगळवेढा–उचेठाण हा रस्ता असून, सदर रस्त्याच्या पश्चिमेस गट क्र. १५२ ही भोगवटदार वर्ग २ भुधारणा पध्दतीची जमिन आहे. सदर जमिनीपैकी गट क्र. १५२/१८/क, क्षेत्र १हे.३६आर ही मिळकत प्रतिवादीच्या वहिवाटीस आहे. सदर मिळकतीच्या धारक सदरी प्रतिवादीचे नांव आहे. पंरतू, सदर जमिनीच्या हद्दी वहिवाटी निश्चित नाहीत. प्रतिवादीचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नसताना, दि. २३.०८.२०२१ रोजी प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये पश्चिम–दक्षिण कोप–यात बेकायदेशीरपणे घूसून, दावा मिळकतीच्या हद्दीखुणा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादीने ट्रॅक्टर व जेसीबीच्या साहयाने खड्डे खणून सिमेंट पोल उभारण्याचा प्रयत्न केला. वादीने प्रतिवादीस विरोध केला असता, त्याने वादीस दावा मिळकतीतून हाकलून देण्याची धमकी दिली. त्यामुळे वादीने दावा व प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादीविरुध्द वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये, असा तुर्तातुर्त मनाई आदेश देणे आवश्यक आहे. अन्यथा प्रतिवादी वादीस दावा मिळकतीतून हुसकावून लावेल व वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. तरी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी नि.क्र. १६ अन्वये दाव्यास कैफियत व तुर्तातूर्त मनाई अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला. प्रतिवादीच्या कथनानुसार, गट क्र. १५२ ही भोगवटदार वर्ग २ भुधारणा पध्दतीची फॉरेस्टची जमिन आहे. सदर जमिनीपैकी ४हे–४आर इतके क्षेत्र प्रतिवादीचे पूर्वज बलभिम पांढरे यांना नविन शर्तीवर दि.१४.०६.१९८७ च्या आदेशान्वये वाटपाने देण्यात आले. त्यानंतर सदर मिळकत वारस लोचनाबाई वाघमोडे यांना वारसाने मिळाली. त्यांनी सदर मिळकत नातू श्रीरंग, मारुती व बजरंग यांना स्वखुशीने

व लेखी अर्जाने दिली. त्याप्रमाणे फेरफार क्र. ४५३ नुसार नोंद प्रमाणित झाली. त्यावेळी प्रतिवादी व त्याचे भाऊ अज्ञान होते. त्यामुळे त्यांचे वडिल सदर मिळकतीमध्ये मालकीहक्काने वहिवाट करीत होते. त्यानंतर झालेल्या वाटपानुसार, सदर मिळकत प्रतिवादीच्या हिश्यास आली. तेव्हापासून प्रतिवादी सदर मिळकतीत मालकीहक्काने वहिवाट करीत आहेत. सदर जमिनीच्या समोरुन जाणा–या मंगळवेढा – उचेठाण रस्त्यावरुन वादी व इतर शेतक–यांना पश्चिम–पूर्व व प्रतिवादीच्या शेतजमिनीच्या पूर्वेकडून पश्चिमेकडे पूर्वापार गाडी रस्ता गेलेला आहे. प्रतिवादींनी सदर रस्त्याच्या पूर्वेकडील बाजूस दुकानाच्या पाठीमागे बोअर घेतलेली आहे. वादीची जमिन प्रतिवादीच्या जमिनीस लगत नाही. वादीने नमूद केलेले चर्तुःसिमा पाहता, त्यामध्ये प्रतिवादीचा गट क्र. १५२/१८/क हा नमूद नाही. गट क्र. १३० चे उपगट असून, प्रतिवादीच्या दक्षिणेकडील हद्दीवर गाडी रस्ता आहे. त्याला लागून वादीची जमिन आहे. त्यामुळे प्रतिवादीने वादीच्या जमिनीत अतिक्रमण करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वादीने दावा मिळकतीचे अद्याप मोजणी केली नाही. त्यामुळे प्रतिवादीने वादीच्या जमिनीत घुसण्याचा प्रयत्न केला, ही बाब सिध्द होत नाही. वादीस सकृतदर्शनी केस नाही. मनाई अर्ज मंजूर केल्यास, प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होईल. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. दोन्ही बाजूंच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, खालील वादप्रश्न माझे विचारार्थ उपस्थित झालेले आहेत. त्याखालील दिलेल्या कारणांसाठी मी त्यांचे निष्कर्ष नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींचे लाभात प्रथमदर्शनी केस असल्याचे वादींनी सिध्द केले काय? | **नाही.** |
| २. | वादींचे लाभात न्यायाचा समतोल असल्याचे वादींनी सिध्द केले काय? | **नाही.** |
| ३. | मनाई हुकून न दिल्यास वादींचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल, असे वादींनी सिध्द केले काय? | **नाही.** |
| ४. | आदेश कोणता? | **प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेत येतो.** |

## कारणमिमांसा

**५.** प्रस्तुत अर्जाच्या पृष्टयर्थ वादीने दावा मिळकतीचा ७/१२ उतारा, गट क्र. १५२/१८/क चा ७/१२ उतारा, मिळकतीबाबत वस्तुस्थितीदर्शक छायाचित्र अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच त्रयस्थ इसम नागनाथ पाटील व उत्तम साखरे यांनी प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहेत. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी म्हणणेच्या पृष्टर्थ्य गट क्र. १५२/१८/क चा ७/१२ उतारा, फेरफार क्र. १२४९ व ४५३ चे उतारे, बोअरवेलची वीज देयक, कर पावती, रस्ता दुरुस्तीबाबतचा अर्ज, वस्तुस्थितीदर्शक फोटो, संमतीपत्र, ग्रामपंचायतीचे पत्र इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

६. सकृतदर्शनी केस म्हणजे दिवाणी पक्षकाराने त्याचे कायदेशीर कथनांबाबत सबळ पुरावा सादर करणे होय. याठिकाणी सकृतदर्शनी केस शाबीत करताना वादींना त्याच्या दाव्यातील कथनांतील सर्व बाबी संदर्भात सबळ पुरावा देणे गरजेचे आहे. परंतू जर वादीस त्याचे मागणीस दुजोरा देणारा सबळ पुरावा मांडला आला नाही, तर प्रतिवादीच्या हक्कात निर्णय देणे अनिवार्य ठरते. कारण दिवाणी केसमध्ये न्यायालयास स्वतःची बाजू पटवून देण्याची प्रथम व महत्वपूर्ण जबाबदारी ही नेहमी वादीचीच असते.

**<u>वादप्रश्न क्र.१ ते ३ करिता</u> :**

७. सदरचे तिन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रितरित्या करण्यात येत आहे.

८. वादींच्या कथनानुसार, दावा मिळकत ही वादीची वडिलोपार्जित मिळकत आहे. सदर मिळकतीच्या पश्चिमेस मंगळवेढा–उचेठाण रस्ता असून, सदर रस्त्याच्या पश्चिमेस असणारा गट क्र. १५२ हा भोगवटदार वर्ग २ भुधारणा पध्दतीची मिळकत आहे. सदरील मिळकतीपैकी गट क्र. १५२/१८/क क्षेत्र १हे–३६आर इतके क्षेत्र प्रतिवादीच्या वहिवाटीत आहे. वादी यांनी दाखल केलेल्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीच्या भोगवटदार सदरी वादी यांच्या नांवाची नोंद असल्याचे दिसून येते. तसेच गट क्र. १५२/१८/क च्या भोगवटदार सदरी प्रतिवादीच्या नांवाची नोंद असून, भुधारणा पध्दत भोगवटदार वर्ग २ पध्दतीची आहे. प्रतिवादी यांनी देखील वादीच्या मालकीबाबत वाद उपस्थित केलेला नाही. वादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादीचा दावा मिळकतीशी काही संबंध नसताना, प्रतिवादीने दि.२३.०८.२०२१ रोजी दावा मिळकतीमध्ये पश्चिम–दक्षिण

कोप–यात बेकायदेशीरपणे घुसण्याचा प्रयत्न केला व हद्दीखुणा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. तसेच मनुष्यबळाच्या आधारे, ट्रॅक्टर व जेसीबीच्या साहयाने खड्डे खणून सिमेंट पोल उभारण्याचा प्रयत्न केला व साधारणः १२ सिमेंट पोल उभा केले. याउलट प्रतिवादीच्या कथनांनुसार, त्याची मिळकतीपैकी २०गुंठे क्षेत्र हे मंगळवेढा–उचेठाण रस्त्याच्या पूर्वेस आहे व उर्वरित क्षेत्र पश्चिमेस आहे. त्यामुळे दावा मिळकत प्रतिवादी यांच्या मिळकतीच्या लगत नाही. त्यामुळे प्रतिवादीने वादीच्या मिळकतीत अतिक्रमण करण्याचा प्रश्न येत नाही.

९. वादी यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्टर्थ्य दाव्यासोबत नकाशाची छायांकित प्रत दाखल केली आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता, गट क्र. १३० च्या पश्चिमेस रस्ता व रस्त्याच्या पश्चिमेस गट क्र. १५२ असल्याचे दिसून येते. सदर रस्त्यामुळे गट क्र.१३० चे दोन भाग झाले असल्याचे व एका भागाच्या पश्चिमेस गट क्र. १५२ असल्याचे दिसून येते. याउलट प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या गट क्र. १५२ च्या नकाशाचे अवलोकन केले असता, गट क्र. १५२ मधून मंगळवेढा–उचेठाण रस्ता गेल्याने, गट क्र. १५२ हा दोन ठिकाणी विभागल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी दाखल केलेला नकाशा हा केवळ गट क्र. १५२ चा असल्याने त्यामध्ये दावा मिळकत सदर गटाच्या लगत आहे किंवा कसे, हे दिसून येत नाही. वादी यांनी दाखल केलेल्या छायांकीत नकाशाच्या प्रतीवरुन दावा मिळकत ही प्रतिवादीच्या मिळकतीच्या लगत नसल्याचे दिसून येते. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी दि.२३.०८.२०२१ रोजी दावा मिळकतीत घूसून १२ सिमेंट पोल उभे केलयाचे कथन केलेले आहे. सदर कथनाच्या पृष्टयर्थ वादी यांनी दावा मिळकती बाबतचे छायाचित्रे दाखल केलेली आहे. सदर छायाचित्रांचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीत पोल उभे केल्याचे दिसून येते. याउलट प्रतिवादी यांच्या कथनानुसार त्यांनी मंगळवेढा–उचेठाण रस्त्याच्या पूर्वेस असणा–या त्यांच्या क्षेत्रामध्ये पूर्वी असलेल्या दुकानालगत पत्राचे शेड बांधल्याने वादीने विनाकारण दावा दाखल केलेला आहे. त्यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्टयर्थ छायाचित्रे दाखल कलेले आहे. सदर छायाचित्रांचे अवलोकन केले असता, त्यामध्ये पत्राशेड उभे केल्याचे व त्यालगत रस्ता असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत पश्चिम–दक्षिण कोप–यात खड्डे खणून पोल उभे केल्याबाबत सकृत दर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे वादीस प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने असल्याचा दिसून येत नाही. त्यामुळे मनाई अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमित असे

नुकसान होईल, असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. सबब, वादप्रश्न क्र.१ ते ३ करिताचे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविले आहेत.

**वादप्रश्न क्र.४ करिता :**

**१०.** वादप्रश्न क्र.१ ते ३ करिताचे निष्कर्षाच्या अनुषंगाने, मी वादप्रश्न क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. वादींचा प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्याच्या निकालाच्या वेळी ठरविण्यात येईल.

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2025.10.07 16:44:09 +0530

(एम. एस. माळी)

दिनांक – ०६/१०/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा

# **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word to word, as per the original Order.

(a) Name of the Stenographer Grade III: Priyank Tukaram Jadhav

(b) Name of the Court : Jt. C.J.J.D, Mangalwedha, Dist. Solapur,

(c) Order signed by P.O. on : 06.10.2025.

(d) Order uploaded on : 06.10.2025.